## सांजवेळ

सांज आली दाटूनी
रवी गेला गगनी
घरट्यात परतली पाखरे
नभांगणी लुकलुकती नक्षत्रे ---

कुरणातूनी घेई घंटनाद
गायीगुरे परतूनी येतांना
बछड्यांच्या भेटीची आस
हंबरतांना घालीते साद ---

घराताल्या अंगणात
मंद मंद डोले तुळस
नंदादीप उजळता
भरतो प्रकाश आसपास ---

लिंबोणीच्या झाडामागे
रंगला चंद्रतारकांचा खेळ
मेघांच्या क्रीडांगणी
नयनरम्य साधला मेळ ---

दैताच खट्याळ वाऱ्याने झुला
प्राजक्त रातराणीचा सुवास
दरवळे हळूहळूच सर्वदूर
उगाचच कां वाटे मनाला हुरहुर ??

सौ विजया पुरुषोत्तम जोशी

AIT Global India Pvt. Ltd.
Aspire Intend Transform